पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
।। विद्यया संपन्नता ।।
NAAC Accredited 2015
'B' Grade (CGPA -2.62)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव सोलापूर
ईपीएबीएक्स ०२१७ -२७४४७७८ (११ लाईन्स) विस्तृत क्र २२५ फॅक्स-०२१७-२७४४७७०
: http://su.digitaluniversity.ac, www.sus.ac.in Email; dsw@sus.ac.in

विद्यार्थी विकास विभाग/Department of Student Development

जावक्र पुआहोसोविसो/विद्यार्थी विकास/२०२३-२४/ 6034 दि. 21 SEP 2023

प्रति,

**मा. प्राचार्य,**
सर्व संलग्न महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**विषय:-युवा महोत्सवात वाढीव कलाप्रकाराच्या गुणांकनाबाबत...**

**संदर्भ:-पुआहोसोविसो/विद्यार्थी विकास/२०२३-२४/५९४८/दि.१६/०९/२०२३**

महोदय,

प्रस्तुत विद्यापीठाचा १९ वा युवा महोत्सव (उन्मेष सृजनरंगाचा) दि. १० ते १३ ऑक्टोबर २०२३ दरम्यान स्वेरीज अभियांत्रिकी महाविद्यालय, गोपाळपूर, पंढरपूर येथे आयोजित करण्यात येणार आहे. युवा महोत्सवात वाढीव कलाप्रकाराबाबत अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार २०२३-२४ या वर्षापासून लोककला या विभागात एकुण सहा सांस्कृतिक कलाप्रकाराची वाढ करण्यात आली असून त्याची नियमावली संदर्भिय पत्रासोबत जोडून यापुर्वीच आपणास पाठविली आहे.

लोककला या विभागात वाढ केलेल्या सर्व कलाप्रकाराचे गुण सर्वसाधारण विजेते पदासाठी ग्राहय धरण्यात येणार आहेत. तसेच लोककला विभागातील जादा कलाप्रकारात सहभागी होवून यशस्वी होणा-या महाविद्यालयास कायम स्वरूपी फिरता चषक देण्यात येणार आहे.

**महत्वाची सुचना:- लावणी या कलाप्रकारात १ विद्यार्थी कलाकार किंवा ६ कलाकार विद्यार्थी जरी सहभागी होणार असतील तरी देखील गुणांकनाच्या वेळी सदर कलाप्रकार नृत्य या विभागात (सांघिक कलाप्रकार) म्हणून ग्राहय धरण्यात येईल**

तरी प्रवेशिका पाठवित असताना सोबत जोडल्याप्रमाणे कलाप्रकाराच्या तक्त्यात सहभागी होणार आसलेल्या कला प्रकारासमोर टिक करून विद्यापीठाकडे पाठविण्यात यावे तसेच दि.०४/०९/२०२३ रोजी पाठविण्यात आलेल्या पत्रात नमुद केलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्याबाबत योग्य त्या सूचना आपल्याकडून संघव्यवस्थापक तसेच विद्यार्थ्यांना द्याव्यात व आपल्या विद्यापीठाचा १९ वा युवा महोत्सव २०२३-२४ यशस्वीपणे पार पाडण्यास सहकार्य करावे.

कळावे.

आपला स्नेहांकीत

**[डॉ. केदारनाथ काळवणे]**
संचालक,
विद्यार्थी विकास विभाग